# अ‍ॅग्रोमेटअ‍ॅडवायझरी बुलेटीन
## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
## कृषि हवामानशास्त्र विभाग
## कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५

फोन : ०२०-२९५१६२६४

ई-मेल : amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १०/०७/२०२६
## जिल्हा : सोलापूर

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१०/०७/२०२६ ते १४/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| पाऊस (मिमी) | 1.0 | 0.0 | 0.0 | 2.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 35 | 35 | 36 | 36 | 36 |
| किमान तापमान (अं.सें.) | 24 | 24 | 23 | 23 | 23 |
| ढग स्थिती (आकाश) | 7 | 8 | 6 | 6 | 8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 66 | 63 | 62 | 61 | 60 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 46 | 41 | 37 | 33 | 36 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 15 | 19 | 21 | 22 | 20 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 259 | 264 | 260 | 264 | 269 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०७ ते ११ जुलै, २०२६ दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • ज्या भागात ८० ते १०० मिमी पाऊस झालेला आहे तिथे शेतकरी बांधवांनी पुरेसा ओला व्यावर पेरणी करावी. पेरणी करताना महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शिफारस केलेली बीजप्रक्रिया करावी.<br>• कमी पाऊस झालेल्या क्षेत्रात पेरणीची घाई करू नये व पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी.<br>• पावसाने ओढ दिल्यामुळे महिन्यामध्ये पेरणी झालेल्या उडीद , मूग, चवळी आणि तूर या पिकांमध्ये एक कोळपणी अथवा खुरपणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे तसेच रोपांची प्रती हेक्टर योग्य संख्या राखण्यासाठी विरळणी करावी.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अ‍ॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अ‍ॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा आणि सद्यस्थितीचा विचार करता आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोड किडी च्या जैविक नियंत्र णासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. |
| हुमणी कीड | किडीचे नियंत्रण | हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ, बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम अ‍ॅनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम). |
| सोयाबीन | पेरणी | ज्या भागात ८० ते १०० मिमी पाऊस झालेला आहे तिथे शेतकरी बांधवांनी पुरेसा ओला व्यावर पेरणी करताना बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा. मातीतील ओलावा टिकविण्यासाठी व बाष्पीभवन रोकण्यासाठी अच्छादन (मल्चिंग) करणे फायदेशीर ठरेल.<br>नवीन लागवड मृग बाग साठी शेत तयार करावे. लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. अ‍ॅझोस्पिरीलम - २५ ग्रॅम व पी.एस.बी.-२५ ग्रॅम/ झाड, केळी लागवडीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावीत. वादळी वाऱ्यापासून बागेच्या संरक्षणासाठी सजीव कुंपणाचा वापर करावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | पावसाळ्यामध्ये जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावे, जनावरांचा गोठा व आसपासचा परिसर स्वच्छ व हवेशीर ठेवावा पावसाचे पाणी गोठ्यात जाऊ नये याची काळजी घ्यावी. गोठ्याभोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत चिखल होऊ देऊ नये. हिरव्या चाऱ्या करिता ज्वारी, बाजरी, मका यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याच बरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये संकरित नेपियर लसूण घास यासारखी पिके घ्यावीत . साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो नष्ट करावा . जनावरांचे खाद्य घटक दमट आद्रता युक्त वातावरणात साठवू नयेत त्यामध्ये भिंतीचा जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी घेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : -
ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : १०.०७.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा
प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे